# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,उस्मानाबाद

Govt. Ayurved College, Office of the Dean, Tuljapur road, Madhuban Osmanabad.413 501
तूळजापूर रोड, मधूबन, उस्मानाबाद Ph.No./Fax (02472) 251741, Email-gacosbd@gmail.com

## निविदा सुचना

### जुने व निकामी फर्निचर व यंत्रसामग्री/साधनसामग्री/उपकरणे यांची निविदा पध्द्तीने विक्री करणेसाठी निविदा सुचना

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद या महाविद्यालयातील जुने व निकामी फर्निचर व यंत्रसामग्री/साधनसामग्री/उपकरणे यांची निविदा पध्द्तीने (जेथे आहे तेथून व जशी आहे त्या प्रमाणे)विक्री करणे आहे.

| अ.क्र. | लॉट क्रमांक | साहित्याचे नाव | साहित्याचा तपशील | निविदा शुल्क (डिडि) | अनामत रक्कम (डिडि) | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | निर्लेखीत साहित्य प्रत्यक्ष पाहणी करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | फर्निचर/यंत्र सामग्री | लाकडी खुर्च्या,लोखंडी खुर्च्या, लोखंडी/लाकडी टेबल्स,डिस्टीलेशन अप्रेटस, व्हॅक्युम क्लीनर, डेंटल एक्सरे मशिन, एअर कॉम्प्रेसर इत्यादी. | रु. ५००/- | रु. ५,०००/- | दि.०४.०३.२०२० ते दि.१४.०३.२०२० | दि.१६.०३.२०२० सकाळी ११:३० वा. | दि.०४.०३.२०२० ते दि.१४.०३.२०२० |

उपरोक्त निर्लेखीत वस्तू हया वरील वेळापत्रकानूसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद येथे कार्यालयीन कामकाजाचे वेळात पाहण्यास उपलब्ध असतील. महाविद्यालयाचे निर्लेखीत जुने व निकामी फर्निचर व यंत्रसामग्री/साधनसामग्री/उपकरणे विक्रीसाठी मागविलेल्या निविदा करिता नियम,अटी व शर्ती तसेच निविदा फॉर्म हा या महाविद्यालयाची वेबसाईट gacosbd.edu.in तसेच महाराष्ट्र शासनाचे वेबसाईट Maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे.

Dean
Government Ayurved College
Osmanabad.

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद

## यंत्रसामग्री/फर्निचर निविदाकरिता नियम,अटी व शर्ती

### अत्यावश्यक कागदपत्रे

**अ) तांत्रीक निविदेचा लिफाफा:-(क्र.१)**

१)निविदेसोबत अनामत रक्कम रु.५०००/- चा राष्ट्रीयीकृत बँकेचा डिडि Dean, Government Ayurved College, Osmanabad या नावे काढून सोबत जोडणे आवश्यक राहील.

२)दुकाने (व्यवसाय) आस्थापना अधिनियम नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड/आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे.

३)निविदाकाराने निविदेसोबत निविदेची किंमत रु.५००/- चा राष्ट्रीयीकृत बँकेचा डिडि Dean, Government Ayurved College, Osmanabad या नावे काढून सोबत जोडणे आवश्यक राहील.सदर रक्कम नापरतावा असेल.

**ब) व्यापारी लिफाफा (दरासंबंधी):- (क्र.०२)**

या लिफाफयामध्ये निविदाधारकाने खरेदीकरावयाच्या रकमेचा निविदाफॉर्म संपुर्ण भरुन सादर करावा.

उपरोक्त दोन्ही लिफाफे तिस-या एका मोठया आकाराच्या लिफाफयात घालून लिफाफा मोहोबंद करावा.

### निर्लेखित फर्निचर/यंत्रसामग्री विक्रीबाबत इतर अटि व शर्ती.

१. या महाविद्यालयातील निर्लेखित केलेले जूने निकामी फर्निचरनिविदा पध्दतीने जेथे आहे व जसे आहे तसे विक्री करणे आहे. सदर फर्निचरमध्ये सर्वसाधारणपणे नादुरुस्त झालेल्या खुर्च्या,सागवानी केनिंग लाकडी/लोखंडी खुर्च्या,लोखंडी/साग लाकडी टेबल्स वस्तुंचा समावेश आहे.

२. उपरोक्त वस्तु शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,तुळजापुर रोड,उस्मानाबाद येथे खालील नमुद वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

३. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यांनी सदर साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतचे खरेदी करावयाचे निविदेचे दर बंद लिफाफ्यात या निविदा सुचनेच्या खाली नमुद वेळापत्रकानुसार विहित दिनांकापुर्वी कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोस्टाने सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर दिनांकानंतर प्राप्त होणा-या (हस्ते किंवा पोस्टाने) निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव विहित दिनांकापुर्वी निविदा या कार्यालयास पोहोचविण्याची संबधित निविदाधारकाची जबाबदारी राहील. याबाबत तक्रार चालणार नाही.

४. यशस्वी निविदाधारकास मंजूर निविदा रकमेतून अनामत रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम पाच दिवसात भरणा करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील.

५. सदर विक्री ही लॉट पध्दतीने करण्यात येणार असुन "निर्लेखीत यंत्रसामग्री/फर्निचर खरेदीसाठी निविदा" असे नमुद करुन सदर वस्तु खरेदी करावयाचे एकूण मुल्य दर्शविणारी निविदा सादर करण्यात यावी. सदर निविदेसोबत निविदाधारकाचे पॅनकार्ड,आधारकार्ड व फर्म असल्यास नोंदणीचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

६. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर तात्काळ सदर वस्तु यंत्रसामग्री/फर्निचर आहे त्या ठिकाणाहून स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच निविदा मंजुरीनंतर सदर वस्तुची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

७. यशस्वी निविदाधारकास सदर वस्तु वाहतुक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क /कराचा भरणा,अनुषंगीक खर्चाची संपुर्ण जबाबदारी त्यांची राहील.

८. निविदा उघडण्याच्या विहित वेळेस संबंधित निविदाधारकारास /प्रतिनिधीस व्यक्तीशः उपस्थित राहता येईल. तसेच उपस्थित नसल्यास सदर निविदा उपस्थित निविदाकार/प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील व त्याबाबत अनुपस्थित निविदाकराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

९. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजुरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही. तसेच इतर अयशस्वी निविदाधारकाचे अनामत रक्कमेचे डी.डी.संबंधिताना परत करण्यात येतील.

१०. शासन नियमातील तरतुदीनुसार सदर विक्री करावयाच्या यंत्रसामग्री/फर्निचर विक्रीची किमान रक्कम विहित करण्यात आलेली आहे. त्यापेक्षा जास्तीत जास्त रक्कमेची निविदा मंजुर करण्यात येईल परंतु जर विहित केलेल्या विक्रीच्या किमान रक्कमेपेक्षा कमी रक्कमेची निविदा मंजूर होत असल्यास सदर विक्रीची प्रक्रिया स्थगित करुन नव्याने निविदा मागविण्यात येतील.

११. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट स्वीकारली जाणार नाही.

१२. सदर लिलाव कोणत्याही टप्प्यावर स्वीकारणे अथवा नाकारणे याचे संपुर्ण अधिकार अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३. यशस्वी निविदाधारकाने फर्निचर ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबतच्या मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई दयावी लागेल.

१४. निविदा लिफाफयावर वरच्या भागात "जुने व निकामी यंत्रसामग्री/फर्निचर खरेदीकरिता निविदा" असे स्पष्ट अधोरेखीत करावे.

| अ.क्र. | निविदा प्रक्रिया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०३.०३.२०२० |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | ०४.०३.२०२० ते १४.०३.२०२० |
| ३ | विक्री करावयाचे निर्लेखित निकामी फर्निचर व इतर वस्तु पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | ०४.०३.२०२० ते १४.०३.२०२० |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक | १६.०३.२०२० वेळ सकाळी११.३० वा. |
| ५ | यशस्वी निविदाधारकास संपूर्ण रक्कम भरणा करुन सदर साहित्य ताब्यात घेण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | १६.०३.२०२० ते २१.०३.२०२० |

Dean
Government Ayurved College
Osmanabad.

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,उस्मानाबाद

Govt. Ayurved College, Office of the Dean, Tuljapur road, Madhuban Osmanabad.413 501

तुळजापूर रोड, मधूबन, उस्मानाबाद Ph.No./Fax (02472) 251741, Email-gacosbd@gmail.com

---

## निर्लेखीत केलेले यंत्रसामग्री/फर्निचर विक्री २०१९-२०२०

## निविदा फॉर्म

निविदा किंमतः-रु.५००/-

१)निविदा धारकाचे नाव व पत्ताः-
(फर्म)

२)निविदा सादर करण्याची अंतिम तारिख - दि.१४.०३.२०२०

३)तांत्रीक निविदा (लिफाफा क्र१)उघडण्याची वेळ- दि.१६.०३.२०२० सकाळी ११.३० वाजता

३)व्यापारी लिफाफा (क्र२) उघडण्याची वेळ- दि.१६.०३.२०२० सकाळी ११.३० वाजता

| तपशिल | स्विकृत रक्कम |
|---|---|
| २०१९-२०२० या वर्षात निर्लेखन केलेल्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद येथे साठा केलेल्या सर्व प्रकारचे निर्लेखीत यंत्रसामग्री/फर्निचर आहे त्या ठिकाणापासून, आहे त्या स्थितीत विकत घ्यावयाचे आहे. त्याकरिता समोरील रक्कम मी स्विकृत करित आहे. | रक्कम रु.<br><br>अक्षरी रु. |

तारीखः-
स्थळः-

निविदाधारकाची सही
संपुर्ण नाव व पत्ता